# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.20/04/2021**

## // गोषवारा //

**प्रकरण क्र.07 :- महानगरपालिकेची परिवहन सेवा सुरळीत चालविणेकरीता नवीन धोरण ठरविणेबाबत.**

महानगरपालिकेची परिवहन सेवा सुरळीत सुरू राहणेकामी नवीन धोरण ठरविणेकरीता मंगळवार दि.20/04/2021 रोजीच्या महासभेच्या विषय पत्रिकेवर विषय घेण्यात आल्याने याबाबतचा सविस्तर गोषवारा मा. महासभेत निर्णय घेणेकामी सादर करणेबाबत मा. महापौर महोदया यांनी संदर्भीय पत्रान्वये कळविले आहे.

याप्रकरणी मा. महासभा दि.02/05/2018 (दि.18/04/2018 रोजीची तहकूब सभा) प्रकरण क्र.14, ठराव क्र.15 अन्वये महानगरपालिका परिहवन सेवेचे धोरण निश्चित करणेबाबत मा. आयुक्त यांनी महानगरपालिका पदाधिकारी यांचेसोबत बैठकीच्या निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव पारीत केलेला आहे.

उक्त मा.महासभा ठरावाच्या अनुषंगाने महापौर यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी, गटनेते यांची बैठक दि.05/03/2019 रोजी घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये बस संचलनासाठी Gross Cross Contract (GCC) व Net Cost Contract (NCC with SMF or VGF) या दोन्ही पध्दतीने PPP तत्वावर निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देण्यात आली आहे. सदर दोन्ही प्रकारे प्राप्त निविदांचा तुलनात्मक दृष्या अभ्यास करून ज्या मॉडल वरील निविदा जास्त किफायतशीर असेल, त्या पध्दतीने बसेस चालविण्यासाठी निविदा मंजूरीसाठी प्रस्तावित करावी, असा ठराव पारीत केलेला आहे.

त्यानुसार यापुर्वी दोन्ही पध्दतीने निविदा प्रक्रिया करून NCC with VGF तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त करण्यात आलेला होता. परंतू सदर बस ऑपरेटर मे. भागीरथी एमबीएमटी प्र.लि. यांनी कोवीड-19 लॉकडाऊन शिथील केल्यानंतर बससेवा सुरू न केल्याने त्यांचे समवेतचा करार रद्द करण्यात आलेले आहेत.

मा. महासभा ठराव क्र.15 दि.02/05/2018 च्या अनुषंगाने मा. महापौर यांचे अध्यक्षतेखाली पदाधिकारी यांचे दि.05/03/2019 रोजीचे बैठकीमध्ये GCC व NCC दोन्ही पध्दतीने निविदा मागविणेस मान्यता दिली आहे.

Net Cost Contract (NCC) व Gross Cross Contract (GCC) दोन्ही पध्दतीमधील कामकाज व जबाबदारी याबाबतचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

अ) NCC सदर तत्वावर बसेस चालविणेसाठी

- चालक नेमणे
- बसेसची देखभाल दुरूस्ती करणे
- इंधन वंगण खर्च करणे
- तिकीटाचे उत्पन्न गोळा करणे व त्यासाठी वाहक, प्रवर्तक, निरीक्षक कार्यालयीन कर्मचारी नेमणे
- शासकिय कराचा (प्रवासी व बालपोषण) शासनास भरणा करणे

ही जबाबदारी बस ऑपरेटर यांची असते.

ब) GCC सदर तत्वावर बसेस चालविणेसाठी

- महानगरपालिकेने ठरविलेल्या बसमार्गावर Schedule प्रमाणे बसेस चालविणे
- चालक नेमणे
- बसेसची देखभाल/ दुरूस्ती करणे
- इंधन वंगण खर्च करणे

ही जबाबदारी बस ऑपरेटर यांची असते.

- **या पध्दतीमध्ये वाहक, प्रवर्तक, निरीक्षक व कार्यालयीन कर्मचारी नियुक्त करून तिकीटाचे उत्पन्न गोळा करणे, प्रवासी कर बालपोषण अधिभार शासनाकडे जमा करणेची जबाबदारी महानगरपालिकेची असते.**

NCC तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त करतांना Viability Gap Fund (VGF) देणे क्रमप्राप्त आहे. VGF न देता निविदा प्रक्रिया केली असता, त्यास बस ऑपरेटर यांचेकडून प्रतिसाद मिळत नाही. सदर तत्वावर बस चालवितांना बस ऑपरेटर यांचेकडून ज्या मार्गावर उत्पन्न जास्त आहे, अशाच मार्गावर बस चालविण्याचा कल असतो. तसेच NCC तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त केल्यानंतर भविष्यामध्ये बसची संख्या वाढ करावयाची झाल्यास व त्याच मार्गावर बसची संख्या व Frequency वाढ केल्यास उत्पन्न कमी होऊन बस ऑपरेटर यांचेकडून वाढीव VGF ची मागणी केली जाऊ शकते व त्यामुळे महानगरपालिका व बस ऑपरेटर यांचेमध्ये वाद निर्माण होऊ शकतो.

GCC तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त करतांना प्र.कि.मी. प्रमाणे निश्चित दर द्यावा लागतो. त्यामुळे बस ऑपरेटर यांना महानगरपालिकेने दिलेल्या Schedule नुसार बससेवा चालविणे बंधनकारक असते. बस तिकीटांपासून मिळणारे उत्पनांशी बस ऑपरेटर यांचा संबंध नसतो. त्यामुळे महानगरपालिकेच्या Schedule नुसार बससेवा सुरळीत चालविली जाते व नागरीकांना चांगली सेवा मिळू शकते. तसेच GCC तत्वावर बससेवा चालवितांना भविष्यामध्ये बसेसची संख्या व Frequency वाढ केल्यास बस ऑपरेटर यांचे कोणतेही नुकसान होत नसल्याने वाद निर्माण होण्याची शक्यता नसते. तसेच तिकीटाचे उत्पन्न ही बाब महानगरपालिकेशी संबंधित असल्याने त्यावर महानगरपालिका निर्णय घेण्यास सक्षम असते. मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडे सद्यस्थितीत असलेल्या बसची संख्या अपुरी असून भविष्यामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात वाढीव बसची आवश्यकता आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी ESCBS (Efficient and Sustainable City Bus Service) प्रकल्पातंर्गत Ministry of Housing and Urban Affairs, GOI यांनी नियुक्त केलेले सल्लागार Centre of Excellence in Urban Transport CEPT Research and Development Foundation (CEPT University) यांनी तयार केलेल्या Service and Business Plan for City Bus Operations Report मध्ये 2030 पर्यंत 182 ते 369 बसची आवश्यकता असल्याचे नमुद केले आहे. तसेच सदर अहवालामध्ये त्यांनी सध्याचे NCC मॉडेल बससेवेमध्ये पुरेशी लवचिकता देऊ शकत नसल्याने GCC मॉडेलवर सुरूवात करण्याची सुचना केलेली आहे. तसेच Ministry of Urban Development (Urban Transport wing) यांचेकडील दि.21/04/2014 चे Advisory मध्ये देखील Urban Bus Operation साठी GCC मॉडेलची शिफारस केलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे वस्तूस्थिती पाहता व यापुर्वी NCC तत्वावरील बस ऑपरेटर ठेकेदार नियुक्त केल्यानंतर आलेल्या अडचणी पाहता, भविष्यामध्ये देखील NCC तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त केल्यास अडचणी उद्भवू शकतात. त्यामुळे नागरीकांना उत्तम बससेवा देण्यासाठी GCC तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त करणे योग्य होईल. GCC तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त केल्यास बस चालविणेसाठी चालक नेमणे, बसेसची देखभाल दुरूस्ती व इंधन वंगण इत्यादी जबाबदारी बस ऑपरेटर यांची असेल. तिकीट संकलन करणे, वाहक, प्रवर्तक, निरीक्षक व इतर कार्यालयीन कर्मचारी नेमणे इ. जबाबदारी महानगरपालिकेची असेल. तसेच तिकीटांचे उत्पन्न महानगरपालिकेकडे राहून प्रवासी कर/बालपोषण अधिभार शासनास भरण्याची जबाबदारी महानगरपालिकेची असेल. GCC तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त केल्यास तिकीट दरवाढ, बसची संख्या वाढ व Frequency वाढ करणेसाठी महानगरपालिका निर्णय घेण्यास सक्षम असेल.

तरी, मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बससेवेसाठी Gross Cost Contract (GCC) तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त करणे, तिकीट संकलनासाठी स्वतंत्र एजन्सी नेमणे, पर्यवेक्षण व देखरेख करणसाठी आवश्यक प्रवर्तक, निरीक्षक व इतर अधिकारी/कर्मचारी नेमणेसाठी धोरण निश्चित करून मा. महासभेची आर्थिक व प्रशासकिय मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(मा. आयुक्त यांचे दि.19/04/2021 रोजीचे मान्यतेने)

(अजित मुठे)
परिवहन व्यवस्थापक
मिरा भाईंदर महानगरपालिका